Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-IX Sept. 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Aayushi International Interdisciplinary Research Journal (Refereed & Indexed Journal)
Vol - III Issue-IX SEPTEMBER 2016 ISSN 2349-638x Impact Factor 2.147

# व्यंकटेश माडगूळकरांच्या नाटकातील दलित जीवनविश्व

**डॉ. लहू दिगंबर वाघमारे**
मराठी विभाग,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव
ता. चाकूर जि. लातूर

कथा, कादंबरी, ललितगद्य या वाङ्मय प्रकारात मोलाची भर घालणाऱ्या व्यंकटेश माडगूळकरांनी नाट्यलेखनही केले आहे. त्यांचे नाट्यलेखन विपुल व समृध्द असून 'काळाबरोबर चला', 'कुणाचा कुणाला मेळ नाही', 'जाणार कुठं?','नामा सातपुते', 'पती गेले ग काठेवाडी', 'बिकट वाट वहिवाट', 'सती' इ. नाटके त्यांनी लिहिली आहेत. यातील काही नाटके ग्रामीण जीवनावर आधारित असून त्यांनी अधिक नाटकेही शहरी जीवनावर लिहिलेली आहेत. 'नामा सातपुते', 'तु वेडा कुंभार' आणि 'छोटा जवान' या नाटकांमधून ग्रामीण जीवन व वातावरण व्यक्त झाले आहे. त्यातही 'तू वेडा कुंभार' हे अस्सल ग्रामीण नाटक असून या नाटकातून ग्रामीण भागात शहरीकरणाचे झालेले आक्रमण आणि त्यामुळे एका खेडूत माणसाचे तळमळणारे मन त्यातून व्यक्त झाले आहे. या तीन अंकी सामाजिक नाटकातून एक जिवंत खेडे, त्यातील गावगाडा व बलुतेदारी व्यक्त झाली आहे. तसेच गावातील बदललेले वातावरण, त्यास अनुकूल आणि प्रतिकूल मानसिकता, ग्रामीण माणसाचा विद्रोह आणि बोलीभाषा असे विविध विशेष या नाटकातून व्यक्त होतात.

ग्रामीण भागात वेगाने येणारे शहरीकरण, यंत्रयुग आणि यांत्रिकतेमुळे माणसाला आलेली यांत्रिकता व माणूसकीचा झालेला ऱ्हास हा विषयही या नाटकातून जिवंतपणे व्यक्त होतो. भारतीय खेड्यातील सामाजिक जातीव्यवस्था व त्यातून निर्माण झालेले कर्मविभाजन हेही यातून आविष्कृत होते. मागास जातीतील गावकामगाराच्या व बलुतेदारांच्या विविध कामाचे आणि त्या मोबदल्यात त्याला मिळणाऱ्या बलुत्याचे अत्यंत विस्तृत चित्रण या नाटकातून आले आहे. मातीची मडके, गाडगे बनविणे हा कुंभाराचा पिढीजात व्यवसाय या कादंबरीच्या पूर्ण कथानकात अनेक ठिकाणी चित्रित झाला आहे. इजाप्पा हा जुन्या पिढीचा प्रतिनिधी असून तो या बलुतेदारीच्या व्यवसायात मुरलेला आहे. त्याच्या कष्टाच्या संदर्भाने अनेक ठिकाणी कुंभाराच्या पिढीजात व्यवसायाचे चित्रण आले आहे. नाटकाची पार्श्वभूमी सांगतानाही अंकाच्या प्रारंभी आलेल्या निवेदनात कुंभाराचा व्यवसाय व त्याच्या चाक या साधनांचा उल्लेख आलेला आहे. रांजणवाडी या गावातील हा इजाप्पा कुंभार घागरी बनवतो, सर्वांना पुरवतो आणि त्या मोबदल्यात त्याचे बलुते मागून आणतो व आपला उदरनिर्वाह भागवतो. त्याच्या व्यवसायाचे वर्णन करणारे अनेक प्रसंग या नाटकातून चित्रित झाले आहेत. इजाप्पाचा मुलगा भोजा हा आपला पिढीजात व्यवसाय सोडून शहरात ये-जा करणाऱ्या गाडीच्या शिटा बसविण्याचे काम करतो. तो कुंभार जातीचा पारंपरिक व्यवसाय करीत नाही गावातील नाना इजाप्पा कुंभाराला म्हणतो, ''तुज्या मागारी गावानं कुंभार आनला पायजे भायेरचाच ह्यो तुझा लेक काय चिखलात हात घालायचा न्हाई''[१] नानाच्या या संवादातून कुंभाराच्या व्यवसायाचा संदर्भ आलेला आहे. गावाला कुंभाराची असलेली गरज यातून व्यक्त झाली आहे. तसेच गावगाड्यातील कुंभाराचे स्थानही प्रकट झाले आहे. भोजा व्यवसायापासून दूर जातो. त्याच्या रिकामटेकडेपणाला त्याची पत्नी वंचाही कंटाळते

आणि इजाप्पाने केलेल्या लाडामुळेच भोजा असा वागत असल्याबद्दल इजाप्पालाच दोष देते. दुसरे लोक आपल्या स्वतःच्या बापाला म्हातारपणी जपतात; पण भोजा मात्र बापाकडे दुर्लक्ष करतो. हे सांगताना वंचा म्हणते, ''काचेची हंडी जपावा तशी जपत्यात लेक दुसरे आपल्या म्हाताऱ्या बापास्नी. आन् तुम्हास्नी अजून चिखूल तुडवाया लागतोय. दिवसभर गुरावानी राबावं लागतंय''[२] वंचाच्या या संवादातून इजाप्पाच्या गावकीच्या व कष्टाच्या कामाचे वर्णन आले आहे. इजाप्पा हा ही गावकी व बलुतेदारी टिकविण्याचा प्रयत्न करतो. तर भोजा ती नष्ट करून नवे हॉटेल उभा करण्याचा प्रयत्न करतो. ग्रामीण भागात चाललेल्या या जुन्या आणि नव्या मूल्यांच्या संघर्षातून दोन पिढ्यांमध्ये निर्माण झालेला ताण-तणाव या कादंबरीतून चित्रित झाला आहे. भोजा हॉटेल उभा करतो आणि त्याचा पिढीजात व्यवसाय मोडकळीस येतो. म्हणून इजाप्पा बलुते मागण्यासाठी घरोघर फिरतो; परंतु त्याला दोन पायल्या ज्वारी मिळते. अधिक मोबदला मिळत नाही याचे कारण सांगताना इजाप्पा म्हणतो, ''धंदा हॉटेलवाल्याचा करू लागल्यावर कुंभारकीचं बलुतं देनार कोन? सगळा धंदा मोडला पोरानं. गाडगी न्हाईत, मडकी न्हाईत.''[३] इजाप्पाच्या या संवादातून ग्रामीण भागातील उद्ध्वस्त होत असलेली बलुतेदारीची व्यवस्था व त्यामुळे निर्माण झालेली बलुतेदारांच्या जगण्याची समस्या व्यक्त झाली आहे. कुंभाराचा व्यवसाय व त्याच्या बलुत्याचेही चित्रण येथे आले आहे. भोजा गावात हॉटेल सुरू करतो हे पाहून इजाप्पा दुःखी होतो. भोजाने आपला पारंपरिक व्यवसाय करावा असेच त्याला वाटते; परंतु भोजा मात्र वडिलांचे ऐकत नाही. वंचा हॉटेलमध्ये काम करते. तिचे हे गावाच्यापुढे जाणे व उष्टे, खरकटे काढणे इजाप्पाला पटत नाही. तो सुनेला यासंबंधी बोलतो तेव्हा ती इजाप्पाला म्हणते, ''नवरा मडकी करत हुता तवा नव्हते का गावभर फिरून लीद गोळा करत? गाढवं नव्हते सोडत? माझ्या कुंकवाचा धनी जो धंदा करेल त्यात मला नको मदत करायला?''[४] वंचाच्या या संवादातून कुंभार जातीच्या पिढीजात व्यवसायाचे चित्रण आले आहे. वंचा हॉटेलमध्ये काम करते हे पाहून अब्रूची चाड असलेला इजाप्पा वंचावर संतापतो, तिच्यावर ओरडतो. तेव्हा ती भोजाचा इजाप्पानेच लाड केल्यामुळे भोजा वाहावत गेला. इजाप्पाने त्याचे हे वाहावत जाणे वेळीच थांबवले नसल्याबद्दल वंचा इजाप्पालाच दूषण देते. तेव्हा इजाप्पा म्हणतो, ''ह्या हातांनी मी काईच केलं न्हाई ! माती मळली, घटाला आकार दिला. चाक फिरत ठेवलं''[५] इजाप्पाच्या या संवादातून कुंभार व्यवसायाच्या कामाचे वर्णन आले आहे. या व्यवसायाच्या अशा अनेक वर्णनाचे तपशील या नाटकातून येतात आणि गावगाड्यातील कुंभार व त्याचे ग्रामव्यवस्थेतील स्थानही स्पष्ट होते. एका बलुतेदार कनिष्ठवर्गीय जातीतील गावकीच्या कामाचे व त्याच्या मोबदल्याचे चित्रण या नाटकातून जिवंतपणे आले आहे. तसेच ही बलुतेदारी नष्ट होत असल्यामुळे बलुतेदाराच्या मनाची होणारी तगमग व अस्वस्थताही या नाटकातील काही प्रसंगांतून व्यक्त झाली आहे. 'नामा सातपुते' या नाटकातूनही कनिष्ठवर्गीय बलुतेदारांच्या जातीचे व त्यांच्या कामाचे चित्रण आले आहे. हे तीन अंकी सामाजिक नाटक असून यात नामा एका मध्यमवर्गीय शहरातील कारखान्यामध्ये काम शोधण्यासाठी आपल्या पत्नीला घेऊन येतो आणि कारखान्याच्या मालकास भेटून कामाची मागणी करतो; परंतु नामाचे शिक्षण नसल्यामुळे तो मालक त्याला फुलझाडे लावण्याचे व ती जगवण्याचे माळीकाम करण्यास सांगतो. तेव्हा नामा ते काम आपल्याला जमत नसल्याचे सांगतो तेव्हा तो मालक म्हणतो, ''बरं, घिसाडी काम येतं का? लोहाराकाम येतं का?''[६] मालकाच्या या संवादातून गावगाड्यातील लोहाराचे व त्याच्या लोहाराच्या बलुतेदारीच्या लोहार कामाचे संदर्भ आले आहेत. तसेच 'घिसाडी' या मागास आणि भटक्या जातीतील कामाचे वर्णनही आले आहे. याच नाटकात 'कोल्हाटी' या नाचणाऱ्या व भटक्याच्या जातीचे आणि त्यांच्या नाचण्याच्या

व्यवसायाचे केवळ वर्णन आले आहे. नामा ज्या आपल्या आत्तीच्या गावात राहातो तेथे भगवंतराव नावाचा एक खलनायकी पुरुष राहतो. त्याचे 'आबई' या स्त्रीबरोबर अनैतिक संबंध असतात. भगवंतराव नामाच्या पत्नीला पाहतो तेव्हापासून आत्तीच्या घरी त्याचे जाणे-येणे वाढते. एके दिवशी तो आबईकडे जेवण न करता या आत्तीकडे जेवणासाठी जाण्यास निघतो तेव्हा आबई भगवंतरावास ''कुटं गाण्याला जाताय का कोलाटणीकडं''[७] असे विचारते. यातून नाचणाऱ्या कोल्हाटी जातीतील स्त्रियांचे या वर्णव्यवस्थेतील स्थान व्यक्त होते. या जातीतील स्त्रियांनी नाचकाम करून सर्वांचे मनोरंजन करावे व प्रसंगी पुरुषांच्या वासनेची भूक भागवावी, ही भारतीय समाजजीवनातील प्रथा येथे व्यक्त झाली आहे. 'कोल्हाटी' या भटक्या जातीतील स्त्रियांचे आणि त्यांच्या नाचण्याच्या व्यवसायाचे चित्रण येथे लेखकांनी सूचकपणे केले आहे.

'बिकट वाट वहिवाट' या तीन अंकी सामाजिक नाटकातूनही काही बलुतेदारांच्या कामकाजाचे व बलुतेदारीचे चित्रण आले आहे. येथे या बलुतेदारीचे विस्ताराने वर्णन येत नाही तर त्याचा अनेकदा केवळ उल्लेखच होतो. मोगलाईतील सामाजिक वातावरण या नाटकातून आले आहे. या नाटकातील नानाच्या मुलीच्या लग्नाच्या संदर्भाने अनेक मागास जातीतील पुरुषांच्या जातीचा उल्लेख आलेला आहे. या नाटकातील नाना हे प्रमुख पात्र असून तो गवळ्याचा व्यवसाय करतो. गावगाड्यातील गवळ्याच्या व्यवसायाचे वर्णन येथे आले आहे. राधा ही नानाची मुलगी असून महादेव शिंपी हा तिच्याशी लग्न करू इच्छितो, तेव्हा नाना त्याला म्हणतो, ''अरे, तू एक साधा शिंपी, गरीब टेलर''[८] या संवादातून महादेवच्या जातीचा, व्यवसायाचा आणि दारिद्र्याचा उल्लेख आलेला आहे.

व्यंकटेश माडगूळकरांच्या नाट्यलेखनातून दलितातील काही जातीच्या तराळकीच्या कामाचे, बलुतेदारीचे व त्याच्या अस्पृश्यतेचे, नम्रतेचे व लाचारीचेही वर्णन आले आहे. विशेषतः 'तू वेडा कुंभार' या नाटकातून ते अधिक प्रमाणात आलेले आढळते. येथे कुंभार व महार या मागासवर्गीय, दलित जातीतील अंतर्गत जातीयतेचे व उच्च-नीचतेचेही दर्शन घडते. इजाप्पाचे पांढरे गाढव भोजा सोडून नेऊन विकतो व त्याचे काही साहित्य घेऊन येतो. इजाप्पा आणि वंचाला आपले गाढव चोरीला गेले की सुटून गेले हे कळत नाही म्हणून ते गावातील रामोशाला वर्दी देतात. बाबऱ्या महार इजाप्पाकडे येतो आणि त्यांना जोहार करतो. इजाप्पा बावऱ्यास अरे-तुरेच्या भाषेत बोलतो तर बावऱ्या हा इजाप्पाला आहो-जाहोच्या आदरार्थी भाषेत बोलतो. यातून या देशातील कनिष्ठ जाती, मागास जाती व दलित जाती यातील अंतर्गत जातीय विषमतेचे दाहक रूप व्यक्त झाले आहे. बावऱ्या चोपडीच्या कुंभाराचीही दोन गाढवे नाहीसे झाल्याचे सांगतो. तसेच इस्लामपूरला आलेल्या सर्कशीतील जनावरांचे खाद्य म्हणून त्यांना चारण्यासाठी ही गाढवे चोरून विकली जात असल्याचे सांगतो. बावऱ्या हा इजाप्पाच्या कुंभार जातीपेक्षा हीन आहे. म्हणूनच इजाप्पा त्याला तुच्छतेच्या व अरे-तुरेच्या भाषेत बोलतो, तर बावऱ्या मात्र त्याला सन्मानाने बोलतो. त्याला आदराने 'मालक' म्हणतो. 'महार' हा या वर्णव्यवस्थेतील अस्पृश्य असून तो या गावगाड्यातील एक गावकामगार आहे. म्हणूनच त्याला इजाप्पा आपले गाढव शोधण्याचे काम सांगतो. भारतातील अंतर्गत जातिव्यवस्थेचे व जातिविषमतेचे अत्यंत विद्रूप रूप येथे चित्रित झाले आहे. मागासवर्गीयात विविध जाती आहेत. त्यातील प्रत्येक जात दुसऱ्या जातीला आपल्या जातीपेक्षा हीन समजते. भारतीय समाजजीवनाच्या मागास जातीतील अंतर्गत जातियतेची व उच्च-नीचतेची उतरंड या नाटकातून व्यक्त झाली आहे.

प्रस्तुत नाटकातून 'महार' या दलित जातीतील गावकीच्या कामाबरोबरच गावगाड्यातील रामोशी या जातीच्या गावकीच्या कामाचेही वर्णन आले आहे. गोंदा रामोशी या पात्रांच्या प्रातिनिधिक चित्रणातून रामोशी समाजाच्या गावकीच्या कामाचे, त्याच्या सोशीकतेचे आणि हीनतेचे चित्रण आले आहे.

रामोशी समाजाला गावगाड्यात गावाचे रक्षण करावे लागते. चोरांपासून व जनावरांपासून गावाचे व शिवारातील पिकांचे संरक्षण करावे लागते. तसेच एखाद्याच्या धान्याची, पिकाची, प्राण्यांची किंवा घरातील संपतीची चोरी झाली असेल तर त्याचा तपास लावावा लागतो. त्याच्याकडे असलेली कौशल्ये वापरून तो त्या चोरीचा अचूक माग काढून तपास लावतो. प्रस्तुत नाटकातील रामोशी गोंदा इजाप्पाच्या गाढवाचा अचूक माग काढतो व हे गाढव नेणारा चोर घरचाच असल्याचे सांगतो. कुंभार असलेले इजाप्पा व भोजा गोंदाला अरे-तुरेच्याच भाषेत बोलतात, तर या दोघांनाही गोंदा आदराने मालक म्हणतो आणि आहो-जाहो असे संबोधतो. महाराप्रमाणेच रामोशीही कुंभारापेक्षा हीन दर्जाचा आहे म्हणूनच कुंभार त्याला तुच्छ लेखतो या वर्णव्यवस्थेचा गुलाम समजून इतर सर्व मागास व कनिष्ठ जातीसुध्दा महार जातीला हीन, तुच्छ लेखतात हेच येथे स्पष्ट होते. भोजा बावऱ्याला आपल्या घरासमोरील देऊळ पाडण्यासाठी बोलावतो. भोजाला आपला पारंपरिक व्यवसाय सोडून हॉटेल उभा करायचे असते. त्यासाठी तो बावऱ्याला हे देऊळ पाडण्याचे काम सांगतो आणि त्याचा मोबदलाही ठरतो. या कामाच्या मोबदल्यात जुंदळ्याऐवजी सहा आने रोजगार गोंदा मागतो. येथे रामोशी समाजाच्या बलुतेदारीच्या कामाबरोबरच त्यांच्या रोजंदारीच्या कामाचेही चित्रण आले आहे. गावगाड्यातील बलुतेदारीच्या कामाबरोबरच महाराची आध्यात्मिकताही या नाटकातून व्यक्त झाली आहे. महार, मांग या दलित जातींना तुच्छ समजून त्यांना हिंदू धर्माने भक्तीचा अधिकार नाकारला, त्यांचा स्पर्श वर्ज्य मानला. या समाजात गुलामीची व लाचारीची प्रवृत्ती असल्यामुळे या समाजातील लोकही आध्यात्मिक शोषण सहन करतात. ज्या खोट्या देवांच्या भक्तीपासून त्यांना दूर ठेवले आहे, त्या देवांना ते नाकारीत नाहीत, तर तो देव आपल्यामुळे बाटला जाऊ नये याची काळजी ते घेतात. दलित समाजातील या दास्यत्वतेचा वेध या नाटकातून व्यंकटेश माडगूळकरांनी घेतलेला आहे. भोजाच्या दारासमोर मोटार लावण्यासाठी अडसर ठरणारे देऊळ पाडण्याचे व त्याला स्पर्श करण्याचे बावऱ्याचे धारिष्ट्य होत नाही म्हणून तो भोजाला म्हणतो, ''हे अवघड लागतंय मालक मला. देवळाला मी शिवू !''[९] बावऱ्या स्वत:च अस्पृश्यतेचे पालन करतो. आपला स्पर्श देवाला होऊ नये विटाळ होऊ नये, म्हणून तो आपला अस्पृश्यतेचा धर्म पाळतो. अस्पृश्यांच्या सहनशीलतेचे व सोशीकतेचेही चित्रण या नाटकातून आले आहे. तसेच दलित समाजाच्या आध्यात्मिकतेचे व श्रध्देचेही चित्रण आले आहे. भोजा बावऱ्याला गावातील देऊळ दलित येदू गवंड्याने बांधल्याची आठवण करून देतो. ज्या देवाचे देऊळ अस्पृश्याने बांधले त्याच देवळात अस्पृश्यांना जाता येत नाही. भारतातील या आध्यात्मिक विषमतेचे चित्रणही या नाटकातून आले आहे. बावऱ्या हा शेवटी विटाळ होऊ नये म्हणून देऊळ पाडण्याचे काम नाकारतो, रोजगार नाकारतो, ''देवाचा सराप मी न्हाई घियाचा''[१०] अशी तो भूमिका घेतो. भारतातील भक्तीप्रवणतेचे व आध्यात्मिक विषमतेचे जिवंत चित्रण या नाटकातून आले आहे.

महार समाजाच्या गावकीच्या व रोजंदारीच्या कामाचे, रामोशी समाजाच्या संरक्षण करण्याच्या व माग काढण्याच्या कामाचे चित्रण या नाटकातून आले आहे. तसेच कुंभार समाजाचा गाडगे तयार करण्याचा, गाढवे पाळण्याचा आणि लीद गोळा करण्याचा व्यवसायही या नाटकातून चित्रित झाला आहे. इजाप्पा आपल्या सुनेवर डोळा ठेवून तिच्याशी अनैतिक संबंध ठेवू पाहणाऱ्या ड्रायव्हरचा खून करतो आणि त्यामुळे त्याला दहा वर्षांचा तुरूंगवास होतो. दहा वर्षानंतर जेव्हा तो पुन्हा गावात येतो तेव्हा गावाचा संपूर्ण कायापालट झाल्याचे त्याला दिसते. बलुतेदारी संपून गावात साखर कारखाना सुरू झाल्यामुळे सर्व लोक कारखान्यावर कामाला जातात. अंतर्बाह्य बदललेले आपले गाव पाहून इजाप्पा अस्वस्थ होतो व हरवलेले बलुते गावात मागताना म्हणतो, "भुका लागल्या, आई, मला भुका लागल्यात, मी भिकारी न्हाई,

गावचा बलुतेदार हाये, भीक मागत न्हाई, मी हक्कानं मागतोय''[११] बलुतेदारी नष्ट होणे ही कल्पनाच त्याला सहन होत नाही. खेड्यावर शहराचे झालेले आक्रमण पाहून तो दु:खी होतो. त्याच्या या विचलित झालेल्या मानसिकतेचे व दु:खाचे चित्रण या नाटकातून जिवंतपणे आले आहे.

याशिवाय या विविध नाटकांतून दलित, भटके व इतर काही कनिष्ठ जातींचा विविध संदर्भाने उल्लेख आलेला आहे. कधी व्यक्तिनामाबरोबर, कधी व्यक्तिनामाऐवजी, कधी एखादी उपमा किंवा दृष्टांत म्हणून तर कधी इतर काही कारणाने या विविध जाती-जमातींचा उल्लेख आलेला आहे. भोजा जेंव्हा मोटारवाल्याच्या नादी लागतो तेंव्हा इजाप्पा त्याला त्यापासून दूर करण्याचा प्रयत्न करताना म्हणतो, ''अरं, ह्यो पैका वडायचा धंदा हाय. सुगीला माकडवालं येत्यात, नंदीबैल येत्यात, कोल्हाटी येत्यात, खेळ करत्यात आन् शेर पायली जोंधळं उपटून निघून जात्यात. तसा ह्यो मोटारवाला नवा खेळ करतोय आन् आपल्याला लुटतोय''[१२] इजाप्पाच्या या संवादातून माकडवाले, नंदीबैलवाले, कोल्हाटी यांच्या विविध खेळांचे व त्यामोबदल्यात त्यांना मिळणाऱ्या बलुत्याचे चित्रण येते; परंतु केवळ खेळाचे चित्रण करणे हा उद्देश येथे नाही. तर एक दाखला, उदाहरण व दृष्टांत समजून सांगण्यासाठी येथे या विविध जातींचे व्यवसाय व भटकणे चित्रित झाले आहे. येथे लेखकांनी भटक्यांचे जीवन चित्रण करणे व उदाहरण देणे हे दोन्ही हेतू साधलेले आहेत. व्यक्तिनामाबरोबर जातीचा उल्लेख आल्याचीही काही उदाहरणे येथे आलेली आहेत. उदा. गोंदा रामोशी, भोताराम कुंभार, रंगनाथ सोनार, याबरोबरच व्यक्तिनामाऐवजी बऱ्याच ठिकाणी कुंभार या जातिनामाचा उल्लेख या नाटकात अनेक ठिकाणी आलेला आहे. 'बिकट वाट वहिवाट' या नाटकातूनही पापा कलाल, दामू लव्हार अशी व्यक्तिनावाबरोबर जातीचा उल्लेख आलेली उदाहरणे आहेत, तर धनगर आणि आदिवासी या जातींचा उल्लेख व्यक्तीऐवजी आलेला आहे. 'नामा सातपुते' या नाटकातूनही पापा कलाल, दामू लोहार असा व्यक्तिनामांबरोबर त्यांच्या जातींचा उल्लेख आलेला आहे. तसेच धनगर या जातीचा व्यक्तिनामाऐवजी आणि आदिवासी जमातीचा समूहाऐवजी या नाटकातून उल्लेख आलेला आहे. फासेपारधी, बेलदार या भटक्या व कनिष्ठ जातींचाही गावोगावी हिंडणे आणि रस्त्याकडेला बसणे हा जातिविशेष सांगण्यासाठी केवळ उपमा म्हणून किंवा उदाहरण म्हणून उल्लेख आलेला आहे. व्यंकटेश माडगूळकरांच्या काही नाटकातील या दलित जीवनाच्या चित्रणाशिवाय व संदर्भाशिवाय इतर उर्वरित नाटकांमध्ये दलित जीवनचित्रण किंवा त्याचे संदर्भ येत नाहीत. व्यंकटेश माडगूळकर यांच्या नाट्यलेखनाची भाषा ही इतर वाङ्मय प्रकाराप्रमाणेच माणदेशाच्या परिसरातील बोली भाषा आहे. नाटकाचे निवेदन मात्र प्रमाणभाषेत आणि नागरीभाषेत आहे. या भाषेतील अस्सलपणामुळे व जिवंतपणामुळे ही नाटके व त्यातील ग्रामीण माणसाचे जीवनानुभवही जिवंत झाले आहेत. माणदेश परिसरातील संस्कारातून आलेली ही बोली त्या प्रदेशाचे वेगळेपण सिध्द करते. 'तू वेडा कुंभार' या नाटकातील भाषा तर अधिकच बोलीयुक्त आहे. यातील बयते, रेळवी, चिखुल, नदरं, सुई, आरवण, दिपुटी, म्होरं, सराप, हरिक, इसारलो, लई, येपारी, शानं, च्या, वट्यात, योक, चुकी अशी या भाषेतील अस्सल शब्दकळा यातील ग्रामीणतेला जिवंत करते. त्येच्या, न्हाऊ, हुभी, हाय, हुतं, पायजे, ठिवते, न्हाई, व्हय, हुईल, घियाचा, दील, जितं, मेलंया, म्हनं, माजं, पैसं इ. काही सुट्टे शब्द, नाम आणि क्रियापदाची विविध रूपे माणदेशी बोलीतील आहेत. इष्टांडावर, मोटार यांसारख्या इंग्रजी व सौंसार, वर्दी, दुनिया यांसारख्या इतर भाषेतील शब्दांचा वापरही या नाटकातून करण्यात आलेला आहे. बोळ्यानं दूध पिणे, ढब लटकी आन् चिलीम फुटकी, पाटलाचं घोडं आन् तराळाला भूषान!, पदराला खार लागणे इ. या परिसराच्या बोलीभाषेतील म्हणी या नाटकातून वापरण्यात आल्या आहेत. या म्हणी अत्यंत अर्थपूर्ण असून त्या नाटक जिवंत करणाऱ्या आहेत. 'बिकट वाट वहिवाट', 'नामा

सातपुते' यासारख्या नाटकांतूनही बोलीभाषेचा वापर लेखकांनी केलेला आहे आणि त्यामुळेच नाटकातील जीवनानुभव अत्यंत जिवंतपणे चित्रित झालेला आहे.

**संदर्भ सूची :**

१. व्यंकटेश माडगूळकर, 'तू वेडा कुंभार', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृत्तीयावृत्ती १९८६, पृष्ठ ३.
२. तत्रैव, पृष्ठ ११.
३. तत्रैव, पृष्ठ ५४.
४. तत्रैव, पृष्ठे ५५ - ५६.
५. तत्रैव, पृष्ठ ५८.
६. व्यंकटेश माडगूळकर, 'नामा सातपूते', अनमोल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९७८, पृष्ठ २९.
७. तत्रैव, पृष्ठ ५७.
८. व्यंकटेश माडगूळकर, 'बिकट वाट वहिवाट', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९७८, पृष्ठ ३०.
९. व्यंकटेश माडगूळकर, 'तू वेडा कुंभार', उपरोक्त, पृष्ठ ४०.
१०.तत्रैव, पृष्ठ ४२.
११.तत्रैव, पृष्ठ ६६.
१२.तत्रैव, पृष्ठ १८.